नवी आशा नवी दिशा
# सार्वमत

## जरांगे पाटील यांची भाजप आमदाराला शिवीगाळ

**जालना–** मनोज जरांगे पाटील यांनी भाजप आमदार प्रसाद लाड यांच्यावरही अतिशय खालच्या शब्दांमध्ये टीका केली.हे बांडगूळ आता कोण आहे? मनोज जरांगे यांच्या नादी लागू नये. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांचे तू पाय चाट, त्यांचा थुका चाट, तू माझ्या नादी लागू नको. आमचे काम बाप दाखव नाहीतर श्राद्ध घाल. देवेंद्र फडणवीस यांची बाजू घेणाऱ्या मराठ्यांच्या पोरांचा जीव घेतो का? लाड्या आणि गोड्या कोण तू, तुझ्या तोंडावर थुकत पण नाहीत. असा घणाघात मनोज जरांगे पाटील यांनी प्रसाद लाड यांच्यावर केला.

## तुळजाभवानीच्या दर्शनासाठी नियम, अटी लागू

**तुळजापूर–** आता धाराशिवच्या तुळजाभवानीचं दर्शन करण्यासाठी नियम-अटींचं पालन करावं लागणार आहे. मंदिरातील गाभाऱ्यात प्रवेश करण्यासाठी मंदिर प्रशासनानं एक नियमावलीच तयार केलीय. यानुसार पुजारी, भाविक आणि अन्य व्यक्तींची लेखी नोंद घेतली जाणार आहे. सिंहासन पुजा आणि अभिषेक वेळ वगळता इतरवेळी मंदिरात प्रवेश करणाऱ्यांच्या नोंदी घेतल्या जाणार आहे. शिवाय देवीचा पुरातन आणि नियमित दागिने, खजिना उघडताना पोलिसांना कळविणे सक्तीचं असणार आहे. सुरक्षेच्या कारणास्तव मंदिर प्रशासनानं हा निर्णय घेतला आहे.






### महत्त्वाचे

## खैरी-नाऊर शिवारात ट्रक जळाला



**खैरी निमगाव (वार्ताहर)–** तालुक्यातील खैरी-नाऊर शिवारात श्रीरामपूरहून छत्रपती संभाजीनगरकडे जाणारा ट्रक वायरींगमध्ये शॉर्टसर्कीट झाल्याने पूर्णपणे जळून खाक झाला. श्रीरामपूर येथील सर्फराज पठाण यांच्या मालकीचा चौदा टायर ट्रक एमएच १७ सीव्ही १७७१ हा औरंगाबाद येथील महिंद्राचे शोरूम रत्नप्रभा येथे सव्हिर्सिंग करण्यासाठी जात असताना साधारण रात्री १२ वाजेच्या सुमारास तालुक्यातील खैरी-नाऊर शिवारात सबस्टेशनजवळ अचानक गाडीने पेट घेतल्याचे लक्षात आल्याने पठाण यांनी आग विझवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. मात्र, काही केल्या आग विझत नसल्याने त्यांनी ११२ क्रमांकावर फोन करून सदर घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच श्रीरामपूरहून अग्नीशामक बंब घटनास्थळावर दाखल होऊन आग आटोक्यात आणली. मात्र, तोपर्यंत ट्रक पूर्ण जळाला. दरम्यान यासंदर्भात तालुका पोलिसांत उशिरापर्यंत कुठलीही नोंद नव्हती.

## राहाता बाजार समितीत डाळिंब २३३ रुपये किलो

**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** राहाता बाजार समितीत



गुरुवारी डाळिंबाला जास्तीत जास्त २३३ रुपये भाव प्रतिकिलोला भाव मिळाला. बाजार समितीत डाळिंबाच्या ७२६८ कॅरेटची आवक झाली. डाळिंब नंबर १ ला किमान १५६ रुपये तर जास्तीत जास्त २५५ रुपये प्रतिकिलोला भाव मिळाला. डाळिंब नंबर २ ला किमान १११ रुपये तर जास्तीत जास्त १५५ रुपये. डाळिंब नंबर ३ ला किमान ४६ ते जास्तीत जास्त ११० रुपये. डाळिंब नंबर ४ ला किमान १० रुपये तर जास्तीत जास्त ४५ रुपये असा भाव मिळाला. सोयाबीनला किमान ४२९६ रुपये, जास्तीत जास्त ४३१९ रुपये भाव मिळाला. ज्वारीला सरासरी २१०० रुपये भाव मिळाला. हरभराला किमान ५६०० रुपये तर जास्तीत जास्त ६२०० रुपये भाव मिळाला.

# दरोड्याच्या तयारीतील सशस्त्र टोळीच्या आवळल्या मुसक्या

**राहुरी (तालुका प्रतिनिधी)–** राहुरी तालुक्यातील गुहा शिवारात दरोड्याच्या तयारीत असलेल्या पाच जणांना वाहन व हत्यारांसह राहुरी पोलिसांनी गजाआड केले आहे. दोनजण पळून जाण्यात यशस्वी झाले आहेत.



राहुरी पोलीस पथकास माहिती मिळाली, गुहा परिसरामध्ये काही संशयीत लोक पांढऱ्या रंगाची मालवाहतूक गाडी व दुचाकीने येऊन दरोड्याच्या तयारीने टेहळणी करत आहेत. सदर माहितीच्या अनुषंगाने राहुरी पोलीस स्टेशनचे रात्रगस्त अधिकारी व कर्मचारी यांनी व डीबी पथकाने माहिती मिळालेल्या ठिकाणी छापा टाकून कारवाई केली असता सदर ठिकाणी एकूण सात संशयित इसमांपैकी मोटरसायकल वरील तीन इसम दुचाकीवरून पळून गेले. जागेवर सापडलेल्या सुखदेव रामदास खिलदकर (वय ३० वर्ष,रा. नांदूर ता. आष्टी जि. बीड), साहिल सिकंदर सय्यद (वय २५ वर्ष रा. नांदूर ता. आष्टी जि. बीड), अरुण बाळासाहेब बर्डे (वय २२ वर्ष रा. कुरणवाडी ता. राहुरी जि. अहमदनगर), सोमनाथ रामदास गायकवाड (वय २७ वर्ष रा. कुरणवाडी ता. राहुरी जि. अहमदनगर) यांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडे धारदार शस्त्र, दोऱ्या, स्क्रू ड्रायव्हर, वेगवेगळे पान्हे, केबल कटर, लोखंडी कत्ती, लाइटर असे साहित्य मिळून आले. पथकाने दुचाकीवरून पळून गेलेल्या आरोपींचा पाठलाग केला असता सदर दुचाकीस्वार यांचे नियंत्रण सुटल्याने ते तिघेही तिथे खाली पडले. पोलीस पथकाने धाव घेऊन त्यांना ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यातील एकाला मार लागलेला असल्याने तो पळून जाऊ शकला नाही. त्यास ताब्यात घेऊन त्याचे नाव-गाव विचारले असता त्याने त्याचे नाव शक्तिमान रामदास गायकवाड रा. कुरणवाडी ता. राहुरी जि. अहमदनगर असल्याचे सांगून इतर दोन पळून गेलेल्या आरोपींची नावे बाळू लहानु गायकवाड व नवनाथ तुकाराम पवार असल्याचे सांगितले. या सातही आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१० (४), (५) प्रमाणे राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून एकूण पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना ५ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

सदर कारवाई स.पो.नी देवेंद्र शिंदे, स.पो.नी रविंद्र पिंगळे, पो. उपनि. धर्मराज पाटील, हवालदार शाकुर सय्यद, पो. ना. प्रवीण अहिरे, हवालदार सुरज गायकवाड, राहुल यादव, प्रवीण बागुल, विकास साळवे, सतीश आवारे, बाबासाहेब शेळके,पो.कॉ. प्रमोद ढाकणे, अंकुश भोसले, सतीश कुऱ्हाडे, सचिन ताजणे, आदिनाथ पाखरे, नदीम शेख, गोवर्धन कदम, रोहित पालवे,गणेश लिपणे, अमोल भांड, पो.ना. सचिन धनाड, पो. ना.संतोष दरेकर यांच्या पथकाने केली आहे पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र पिंगळे करत आहेत.

## घोडेगाव-झापवाडी रोडवरून ट्रॉलीसह ट्रॅक्टरची चोरी

**गणेशवाडी (वार्ताहर)–** नेवासा तालुक्यातील घोडेगाव ते झापवाडी रोडवरून इलेक्ट्रिक साहित्यांसह ट्रॅक्टरची चोरी झाल्याची घटना घडली आहे.

पोलीस सुत्रांकडून समजलेल्या माहितीनुसार १७ जुलै रोजी सायंकाळी ६ ते १८ जुलै रोजी सकाळी ६.१५ च्या सुमारास घोडेगाव ते झापवाडी रोडवर नवनाथ चौधरी यांचे गोडाऊनसमोर लावलेला ट्रॅक्टर (एमएच १६ बीएम १०३१) व ट्रॉली तसेच त्यामध्ये सुमारे वीस हजार रुपये किंमतीचे लाईटचे सामान त्यामध्ये आर्थींग पाईप, गार्डींग चॅनल, पाण्याची टाकी, आर्थींग वायर, सिमेंट गोण्या असा एकूण तीन लाख २० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल कुणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेला. याबाबत देवीदास म्हातारदेव आव्हाड (वय ४०) रा. पांगरमल, ता. जि. अहमदनगर यांच्या फिर्यादीवरून सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा र. नं. ३०५/२०२४ बीएनएस ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास हवालदार दत्ता गावडे करत आहेत.

## राहुरी पोलिसांकडून चोरीच्या दोन दुचाकी हस्तगत; तिघे ताब्यात

**राहुरी (प्रतिनिधी)–** राहुरी येथील गुन्हे शोध पथकाने तीन दुचाकी चोरांना गजाआड केले असून या पकडलेल्या टोळीकडून दोन चोरीच्या दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. तसेच आणखी दोन दुचाकी त्यांनी चोरल्याची कबुली दिली आहे.



गेल्या अनेक दिवसांपासून राहुरी शहर व तालुक्यातील विविध भागातून दुचाकी चोरीचे प्रमाण वाढले होते. दरम्यान राहुरी येथील गुन्हे शोध पथक या दुचाकी चोरांचा शोध घेत होते. तपासा दरम्यान पथकाला मिळालेले सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय खबऱ्या मार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या नेतृत्वात सहाय्यक फौजदार तुळशीराम गीते, हवालदार सुरज गायकवाड, राहुल यादव, पोलीस नाईक प्रविण बागुल, प्रमोद ढाकणे, नदीम शेख, सचिन ताजणे, गोवर्धन कदम, जयदीप बडे, अजिनाथ पाखरे, सतीश कुऱ्हाडे, अंकुश भोसले, श्रीरामपूरचे मोबाईल सेलमधील पो.ना. सचिन धनाड, संतोष दरेकर आदींच्या पथकाने दोन संशयितांना त्यांच्या राहत्या घरातून ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केली. मात्र सुरुवातीला त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र, त्यांना पोलिसी खाक्या दाखवताच त्यांनी गुन्ह्याची कबुली देऊन त्यांच्या आणखी एका साथीदाराची माहिती दिली. तेव्हा पथकाने ताबडतोब तिसऱ्या आरोपीस श्रीरामपूर तालुक्यातील उंदिरगाव येथून चोरीच्या दुचाकीसह ताब्यात घेतले. तपासा दरम्यान पथकाने एकूण दोन मोटारसायकल जप्त केल्या असून आरोपींनी देवळाली प्रवरा व टाकळीमिया या ठिकाणावरून आणखी दोन मोटारसायकल चोरल्याची कबुली दिली आहे. नावेद इब्राहिम शेख, वय २३ वर्षे, रा. जातप, ता. राहुरी, मंगेश विष्णू ठाकर, वय २२ वर्षे, रा. सोमय्या फार्म ता. राहुरी, तसेच किशोर अंकुश पवार, वय १९ वर्षे, रा. उंदीरगाव, ता. श्रीरामपूर या तिनही आरोपींना अटक करून त्यांना न्यायालयापुढे हजर केले असता न्यायालयाने त्यांना तीन दिवस पोलीस कोठडी सुनावली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास हवालदार संदीप ठाणगे करत आहेत.

# शिर्डीत दहशतवादी हल्ल्याची अफवा

### सोशल मीडियावर व्हायरल, भाविकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये- पोलीस

**शिर्डी (प्रतिनिधी)–** शहरात एका नामांकित हॉटेलमध्ये दोन युवक आले होते व त्यांच्याकडे तीन जड संशयित बॅगा होत्या. त्यांचे आधारकार्ड मॅच न झाल्याने त्यांना रूम खाली करण्यास सांगितले. ते दोघे जण हॉटेलचे भाडे न देता एका विना नंबरच्या थार या गाडीतून निघून गेले. ही घटना बुधवारी घडली. मात्र ते आतंकवादी असून सर्वांनी सावधान रहावे, अशा आशयाचा मेसेज शिर्डीत सोशल मीडियावर सर्वत्र प्रचंड प्रमाणात व्हायरल झाल्याने शिर्डीसह राज्यात साईभक्तांमध्ये मोठी भीती निर्माण झाली होती.

या अफवेने देशभरातून असंख्य भाविकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. मात्र हा मेसेज पूर्णपणे खोटा असून कोणीतरी खोडासाळपणा करून शिर्डीत अफवा पसरवत असून नागरिक तसेच साईभक्तांनी अफवांवर विश्वास ठेवू नये यासाठी पोलीस उपअधीक्षक शिरीष वमणे यांनी या घटनेसंदर्भात गुरुवारी पत्रकार परिषद घेऊन खुलासा केला.ते म्हणाले, शिर्डीत आतंकवादी आहेत आणि शिर्डी परिसरात थांबले आहेत ही बाब पूर्णपणे खोटी असून कोणीतरी खोडसाळपणाने ही अफवा सोशल मीडियावर पसरविली आहे. तरी सुद्धा पोलीस यंत्रणा या तरुणांचा शोध घेत असून फोटोवरून प्रथमदर्शनी ते गुन्हेगारी प्रवृतीचे वाटतात. परंतु हे तरुण मिळून आल्यानंतरच या सर्व गोष्टींचा खुलासा होईल. तोपर्यंत कोणीही घाबरून जाण्याची गरज नसून कोणीही अफवा तसेच सोशल मीडियावरील पोस्टवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन वमने यांनी केले आहे.

या घटनेची गंभीर दखल पोलीस अधिक्षकांनी घेतली असून स्थानिक गुन्हे शाखेची एक टीम शिर्डीत ठाण मांडून आहे. अर्थात गेल्या सहा महिन्यांपासून कोम्बिंग ऑपरेशन, लॉजिंगची तपासणी तसेच प्रॉपर पेट्रोलिंग थंडावली असून त्यामुळे शिर्डीतील गुन्हेगारीने पुन्हा डोके वर काढले असून त्यासाठी शिर्डी पोलीस प्रशासन कोणती ठोस पावले उचलून कारवाई करते याकडे नागरिकांचे लक्ष लागून आहे.

## आरडगाव येथे बिबट्याचा धुमाकूळ; कालवड व कुत्र्याचा फडशा

**आरडगाव (वार्ताहर)–** राहुरी तालुक्यातील आरडगाव शिवारातील काळे वस्ती व वने वस्ती येथे रात्रीच्यावेळी बिबट्याने धुमाकूळ घातला आहे. बिबट्याने येथील पाळीव प्राण्यावर हल्ला चढवत कालवड व कुत्रा फस्त केल्याची घटना घडल्याने परिसरात घबराटीचे वातावरण पसरले आहे. वन विभागाने पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे,अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

आरडगाव परिसरात बुधवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास काळे वस्ती येथील शेतकरी केशव भागवत म्हसे यांच्या घरातील माणसे झोपेत असताना जनावरांच्या गोठ्यात बांधलेल्या जनावरांचा ओरडल्याचा मोठा आवाज ऐकू आला. घरातील मंडळी बाहेर येऊन गोठ्यात पाहिले असता एक मोठा बिबट्या कालवडीला आपल्या जबड्यात धरून ओढत असल्याचे दिसताच त्यांनी आरडाओरडा सुरू केला. बिबट्याने कालवडीला सोडून तेथून धूम ठोकली. मात्र ती कालवड जागीच ठार झाली होती. तसेच वने वस्ती येथील माजी उपसरपंच शिवाजी यादवराव वने यांच्या घरासमोरील बांधलेल्या कुत्र्याचा देखील बिबट्याने फडशा पाडला. काही दिवसांपूर्वी तंटामुक्तीचे अध्यक्ष राजेंद्र झुगे यांच्या घरासमोर असलेल्या गोठ्यामधील एक शेळी ठार केली होती. हा सर्व प्रकार येथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. आरडगाव परिसरामध्ये अनेक बिबट्यांचा वावर असल्याचे देखील येथील शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे वनविभागाने घटनेचे गांभिर्य लक्षात घेता, तात्काळ बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# रस्त्यांच्या कामाबाबत तक्रारी खपवून घेणार नाही- आ. काळे

**कोपरगाव (प्रतिनिधी)–** मतदार संघाच्या रस्त्यांसाठी निधी आणण्याची जबाबदारी माझी आहे. मात्र या निधीचा योग्य विनियोग करून रस्त्यांची दर्जेदार कामे करण्याची जबाबदारी ही तुमची आहे. त्यामुळे रस्त्यांबाबत पुन्हा नागरिकांच्या तक्रारी आल्यास खपवून घेणार नाही, असे खडे बोल आ. आशुतोष काळे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता वर्षराज शिंदे यांना सुनावले.



नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत आ. काळे यांनी नुकतीच झगडे फाटा ते रांजणगाव देशमुख या रस्त्याची सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व ठेकेदार यांच्यासमवेत पाहणी केली. पाहणी दरम्यान रस्त्याची अल्पावधीतच झालेली दुरवस्था पाहून उपस्थित असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता वर्षराज शिंदे यांना आ. काळे यांनी चांगलेच धारेवर धरत खडे बोल सुनावले. नागरिकांनी खराब रस्त्यांचा खूप त्रास सोसला आहे. त्यांची या त्रासातून मुक्तता करण्यासाठी शासनाच्या विविध विभागाकडून रस्त्यांसाठी ४६० कोटी रुपयांचा निधी आणला आहे. या निधीतून रस्त्यांची दर्जेदार कामे होऊन नागरिकांना टिकावू व मजबूत रस्ते मिळणे अपेक्षित आहे. रस्त्यांच्या कामासाठी मी निधी कमी पडू दिला नाही व भविष्यात देखील कमी पडू देणार नाही. मात्र रस्त्याची कामे दर्जेदार झाली नाही तर त्याचा त्रास नागरिकांना होणार आहे याची अधिकाऱ्यांनी जाणीव ठेवणे गरजेचे आहे. त्यामुळे यापुढील काळात रस्त्यांच्या बाबत तक्रारी आल्यास खपवून घेणार नाही. ज्या ठेकेदाराकडून निकृष्ट कामे होतील त्यांना काळ्या यादीत टाका. मात्र खराब रस्त्यांमुळे नागरिकांना त्रास होणार नाही याची काळजी घ्या. अन्यथा परिणामाला सामोरे जावे लागेल, असा इशारा आ. काळे यांनी उपअभियंता वर्षराज शिंदे यांना दिला. तसेच ठेकेदारास देखील रस्त्याचे काम घेण्याचा आपल्याला आग्रह केला नव्हता. काम दर्जेदार होणार नसेल तर यापुढे रस्त्यांची कामे घेऊ नका, अशा शब्दांत ठेकेदाराची कानउघाडणी केली.

यावेळी रविंद्र चौधरी, बाजार समितीचे संचालक संजय शिंदे, वसंतराव आभाळे, गंगाधर औताडे, प्रविण शिंदे, शंकरराव चव्हाण, आनंदराव चव्हाण, देवेन रोहमारे, बापूराव जावळे, बापूसाहेब वक्ते, शंकरराव गुरसळ, राजेंद्र औताडे, महेंद्र वक्ते, किसन पाडेकर, गोकुळ गुरसळ, केशव जावळे, युवराज गांगवे, किरण पवार, नंदकिशोर औताडे, सिकंदर इनामदार, कल्याण गुरसळ, किरण वक्ते, विलास चव्हाण, शिवाजी होन, विनोद रोहमारे, प्रवीण होन आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

नवी आशा नवी दिशा सार्वमत

हे दैनिक मुद्रक व प्रकाशक राजेंद्र कृष्णराव सोनवणे यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. एन.११, एम.आय.डी.सी, अहमदनगर येथे मुद्रित करुन प्लॉट क्र. एन. ११, एम.आय.डी.सी, अहमदनगर ४१४१११ येथे प्रसिध्द केले आहे. ● संपादक– ✻ अनंत सा. पाटील : ☎ (०२४२२) २२२४६४,२२२६२९. फॅक्स : २२२७९४. अहमदनगर कार्यालय : ☎ (०२४१) २४३११०३/०४ फॅक्स : (०२४१) २४३११०५. R.N.I Regi. No. 31816/1976. पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. रजि. नं. बी.आय.आय./आर.एन.पी./एस.आर.पी./००३/२०२१-२३ (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे)